Marathi L-II 12/4/17

FYBA 04 pages

Sem II **Q.P. Code :02641** (245 copies)

[वेळ : तीन तास] [गुण : १००]

Please check whether you have got the right question paper.

सूचना : 1. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
2. उजवीकडील अंक गुण दर्शवितात.

प्र.१ अ.) साहित्यिक 'कुसुमाग्रज' व 'दया पवार' यांनी अपयशावर मात करून स्वतःला कसे घडविले. 'नापास मुलांची गोष्ट' मधील लेखांच्या आधारे स्पष्ट करा. २०

किंवा

आ.) 'दुसऱ्या वेळी पास झालो' या महात्मा गांधी यांच्या लेखातून बालपण, शिक्षणातील संस्कार व अपयशावर केलेली मात् याबद्दलचे अनुभव कसे व्यक्त होतात, ते थोडक्यात लिहा. २०

प्र.२ अ.) कोर्टातील शिपाई ते मुख्यमंत्री अशी आपली झालेली जडणघडण सुशीलकुमार शिंदे यांनी 'कोठे होतो कोठे आलो' या लेखातून कशी व्यक्त केली आहे, ते स्पष्ट करा २०

किंवा

आ.) प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेऊन वाय. सी. पवार यांनी स्वतःचे वेगळे व्यक्तिमत्व घडविले, त्याबद्दलचे अनुभव 'जडणघडण' लेखातून कसे मांडले आहेत, ते थोडक्यात लिहा. २०

प्र.३ पुढीलपैकी कोणत्याही दोन टिपा लिहा. १०

अ) ना.सी. फडके यांच्या लेखातील 'बालपणीच्या आठवणी'.
आ) सी. रामचंद्र यांचे 'सिनेमाचे वेड'.
इ) शांता शेळके यांनी सांगितलेल्या 'शाळेतील आठवणी'
ई) यशवंतराव गडाख यांचे 'वाचन प्रेम'

प्र.४ अ) जलधारण विभाग, नाशिक येथील कार्यालयीन अधिक्षक रमेश नारायण पवार यांनी दि. २५/२/२०१७ रोजी सायंकाळी ५.०० वा. विभागीय कार्यालयाने २६/२/२०१७ रोजी रंगहाथ पकडले. विभागीय कार्यालयाने २६/०२/२०१७ रोजी या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश दिले. त्यासंदर्भात त्याचे 'अहवालात्मक इतिवृत्त' तयार करा. १०

किंवा

आ) 'ग्रंथमित्र नगर वाचन मंदिर' या संस्थेने आपला पन्नासावा वर्धापन दिन कोणत्या प्रकारे साजरा करावा यासंबंधी विचार विनिमय करण्यासाठी घेतलेल्या सभेचे इतिवृत्त तयार करा. १०

प्र.५ तुमच्या गावात / शहरात नव्याने सुरु होत असलेले पुस्तक भांडाराची वर्तमानपत्रासाठी जाहिरात तयार करा. १०

पुढे पहा



298CDB60C59C7F217A655382926B27E0

प्र.६ अ.) पुढील उतारा वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. १०

व्यक्तिमत्व विकासासाठी भाषिक कौशल्ये अवगत करणे गरजेचे असते. व्यक्तिमत्व विकास आणि भाषिक कौशल्ये यांचा परस्पर संबंध आहे. या कौशल्याने व्यक्तिमत्वाची योग्य अशी जडण-घडण होते. भाषिक कौशल्याच्या मदतीने विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासात विशेष भर पडते. भाषिक कौशल्यात श्रवण, वाचन, लेखन, संभाषण, भाषण ही प्राथमिक कौशल्ये आहेत. त्यांचा आपण येथे विचार करणार आहोत. 'आपल्याला काय येते', यापेक्षा 'काय येत नाही' हे ज्याला ठाऊक तो खरा ज्ञानी !' असे एका विचारवंताने म्हटले आहे. ज्ञान हे माणसाला घडविते, पंख देते आणि ज्ञानभरारी घेण्यास प्रवृत्त करते; म्हणून ज्ञान अवगत करण्यासाठी काही कौशल्याची गरज असते.

पूर्वापार वाचन, लेखन व आकडेमोड ही तीन कौशल्ये सांगण्यात आलेली आहेत. या घटकांच्या अंतरंगात आपण डोकावलो की, आपला या कौशल्याच्या बाबतीत विकास होत जातो. भाषिक कौशल्ये ही नुसती शिकण्यासाठीच उपयोगी पडतात असे नाही तर हीच जीवन व्यवहाराची सुद्धा कौशल्ये ठरतात. ज्ञान आणि जीवन यांची एकत्रित गुंफण करण्यासाठी त्यांची आपणाला नक्कीच उपयोग होतो. आपण जेव्हा श्रवण करत असतो, तेव्हा त्या गोष्टीत एकरूप होणे महत्त्वाचे असते. बोलताना मनातले विचार स्पष्ट व प्रामाणिकपणे इतरांना सांगणे महत्त्वाचे ठरते. लेखन करताना त्यातील आशय वाचकांपर्यंत पोहचला पाहिजे, याचे भान ठेवायला हवे. याच पद्धतीने इतर कौशल्यांची तंत्रे आत्मसात करावी लागतात.

प्र. १ भाषिक कौशल्यांचे महत्त्व कोणते?

२ प्राथमिक भाषिक कौशल्ये कोण - कोणती आहेत?

३ खरा ज्ञानी कोणास म्हटले आहे?

४ भाषिक कौशल्यांचा जीवन व्यवहारासाठी कसा उपयोग होतो?

५ भाषिक कौशल्यांच्या बाबतीत कशाचे भान ठेवायला हवे?

**किंवा**

आ) पुढील उतारा वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

उत्तम कांबळे यांच्या 'वाट तुडवताना' आत्मकथनात साहित्य, तत्त्वज्ञान, धर्म, समाजशास्त्र अशा विविध विषयांवरील मराठी, इंग्रजी अशा शेकडो ग्रंथांचे संदर्भ येथात. जगातल्या उत्तमोत्तम लेखकांचे हे संदर्भ लेखकाच्या हाती एक महत्त्वाची शब्दसत्ता प्रदान करतात. शब्द माणसाला सर्व प्रकारच्या बंधनातून मुक्त करतात. जगातल्या सर्व महान पुरुषांनी आपल्या शब्दावारेच मुक्त केल्याचे अनेक दाखले मिळतात. शब्दांद्वारे स्वातंत्र्य प्राप्त करून घेणाऱ्या माणसाच्या ठायी शब्दसत्तेव्दारे मानवाचे सर्वकष कल्याण व्हावे, हा ध्यास वसतो आणि एक वसा घेतल्यासारखे आपले कार्य करीत असतो. शब्दांशी तो यामुळेच आपले नाते तुटू देत नाही. या आत्मचरित्राच्या अखेरीस लेखक लिहितो "मीही माझी वाट तयार करतोय..... मी माझी वाट तुडवतोय - स्वतःची - माझ्याच घामातून तयार होणारी आणि मलाच ठेच लागल्यामुळे माझ्या अंगठ्यातून वाहणाऱ्या रक्तामुळे चकाकणारे.... या सर्व प्रवासात पुस्तकं माझी छत्र आहेत. शब्द माझे सोबती आहेत. काळीज ओले ठेवण्यासाठी आवश्यक ते अश्रूही माझ्याकडे आहेत.... माझ्या जगण्यात ग्रंथांचा वाटा प्रचंड मोठा - मोजता येणार नाही इतका मोठा. माझ्यावर सावलीही ग्रंथांची आणि माझे हातही ग्रंथाच्याच हातात - मोठ्या विश्वासाने गुंतलेले, मला वाचण्यासाठी अजून वाचायचे आहे."

पुढे पहा

जीवनविषयक कथन करताना लेखक केव्हा चिंतनाची उंची गाठून तरलपणे उंच विहार करतो, तर केव्हा भाषेच्याव्दारे जमिनीच्या तळावर घट्ट पाय रोवून उभा राहतो. हे कळू नये असे भाषेचे लवचिक विभ्रम पाहायला मिळतात. अनेक वाङ्मयप्रकार लेखक हाताळत असल्यामुळे तीही परिमाणे या भाषेला लाभतात. हे सर्व लेखकाच्या मुळच्या झऱ्याला नितळ, पारदर्शक करतात.

प्र. १ 'वाट तुडवताना' मधून कोणकोणत्या विषयावरील ग्रंथाचे संदर्भ येतात?

२ लेखकाने 'शब्दांचे महत्त्व' कसे वर्णन केले आहे?

३ 'पुस्तकं माझी छत्र आहेत', असे लेखक का म्हणतो ?

४ भाषेचे कोणकोणते विशेष उत्तम कांबळे यांनी सांगितले आहेत?

५ उताऱ्यास समर्पक शीर्षक सुचवा.

प्र ७ पुढीलपैकी कोणत्याही एका उताऱ्याचे सारांशलेखन करा . १०

जीवनाच्या वाटचालीत भेटलेल्या असंख्य सज्जनांच्या सहवासाने आणि असंख्य ग्रंथांच्या वाचनाने या जीवनाला पैलू पडत गेले. या विद्याजीवानाच्या उभारणीसाठी लेखकाने वाटेल तेवढे कष्ट घेतले. काही कामांनी तर मनस्वी आनंदही दिला. ज्या कामात कारागिरी, कौशल्य यांच्या वापराचा प्रत्यय यायचा, ती कामे आपल्याला यायलाच हवीत. अशी जिज्ञासाजन्य जिद्दही वाटायची. पण लेखकाची अंतरिक ओढ होती ती ज्ञानाकडे. या वाटचालीतच तो कथा, कविता लिहू लागला. यामुळे शब्दांच्या अंत:स्फूर्त प्रेमामुळे वाचनाच्या माध्यमातून लेखकाने जी शब्दसाधना केलेली होती, तिचे हे फळ होते. मराठी साहित्यातील सर्वच महत्त्वपूर्ण पुस्तकांचे वाचन केले. प्राचीन काळापासूनचे महत्त्वाचे ग्रंथ निमित्तानिमित्ताने वाचले. भाषा, शब्द यांचे महत्व जाणून त्यांचे बळ वाढविण्याचा मन:पूर्वक प्रयत्न केला. या शब्दसत्तेमुळे स्वतःला एक ओळख प्राप्त होत होती. आत्मविश्वास येत होता. लेखकाचे एके ठिकाणी म्हटल्याप्रमाणे पुस्तक वाचताना मला स्वतःला खूप छोटे अगदी सरपटणारा प्राणी झाल्यासारखे वाटायचं. पुस्तक वाचू लागलो, की आपला आकार वाढतोय. सरपटण्याएएवजी आपण चालू लागतो, असं वाटायचं. शब्दसत्तेच्या संदर्भात अणुरणिया थोकड्या कोणत्याही माणसाचा हा आकाशाएवढा अनुभव असतो. यामुळे शब्द हे रत्नांचे धन वाटणे शब्द हे शास्त्र वाटणे ओघानेच आले. ग्रंथ आणि माणसं एकाच वेळी वाचत जाण अतिशय आनंददायी असत असे लेखकाने म्हटले आहे.

**किंवा**

१९३० ते १९५५ या काळच्या तुकड्यात तत्कालीन बदलता समाज आणि नाटके यांची छाननी आहे. आधुनिक युगाच्या टप्प्यावरचे 'आंधळ्यांची शाळा', स्वातंत्र्याचा वेगळा हुंकार असणारे आंबेडकरी जलसे, ना. सी. फडके लिखित मध्यमवर्गीय मनोरंजनपर कृतक नाटके, जातीयताविषयक वेगळा प्रवाह निर्माण करणारे प्रबोधनकार ठाकरेंची नाटके, 'नवा पाईकसारखे गांधीवादी नाटक, स्त्रियांच्या प्रश्नांची मांडणी करणारी नाटके (बायकांचे बंड', 'घराबाहेर', 'कुलवधू', 'भूमिकन्या सीता' इ.) असा मोठा घेर इथे आहे. याचबरोबर स्त्रीया, स्त्रीपार्टी नट

**पुढे पहा**

आणि नाटके हा ही अत्यंत वाचनीय भाग त्यात आहे. ही यादी मुद्दाम अशासाठी दिली, की त्यातून या पहिल्या खंडाचा आवाका लक्षात येऊ शकेल. आपल्या रंगभूमीवरचे आणि समाजकारण - राजकारणावरचे तौलनिक विचार मकरंद साठे आपल्यासमोर ठेवतात. त्यावर कठोर भाष्यही करतात. आपल्या समाजाचे वैचारिक खुजेपण कशात आहे. याचा हा एका अर्थाने शोध आहे. 'वर्ल्ड व्ह्यू (विश्वभान) बाबतीतले आपले कच्चेपण आणि बहुतांश समाज' अँटी इंटेलेक्चुअल' (ज्ञानविरोधी) असणे ही दोन मुख्य कारणे ते परत परत दाखवून देतात. नाटक नावाच्या माध्यमाकडे आपल्या समाजाचा असलेला मध्यमवर्गीय बोटचेपा आणि कोमट दृष्टीकोन ते उघडा करतात. याच बाबत कॉमेड डांगे, वि. स. खांडेकर आणि प्र. के. अत्रे यांची व्यक्तव्येही देतात. हा सारा पट वाचताना आपण अस्वस्थ होतो आणि नव्यानेच आपला इतिहास आणि वर्तमानही पाहू लागतो, हे या पहिल्या खंडाच्या वाचनाचे वैशिष्टये आहे.

प्र.८ पुढीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा. १०

१) वाचन - एक अमृतानुभव

२) भारतीय स्त्री : कालची व आजची

३) आजच्या युवापिढ्यी समोरील आव्हाने

४) प्रसारमाध्यमांचे आजचे स्वरूप

---